महाराष्ट्रातील राजकीय पक्षाची महिला विषयक भूमिका- एक अभ्यास
(विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानवविद्या शाखेअंतर्गत
राज्यशास्त्र विषयात पीएच. डी. विद्यावाचस्पती या पदवीकरिता
सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

जयंत शंकर बोरगावकर

मार्गदर्शक

डॉ. रेखा आर. बने

एस.एस.एम. मुंडे महाविद्यालय, गंगाखेड

संशोधन केंद्र

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

जुलै 2023

महाराष्ट्रातील राजकीय पक्षाची महिला विषयक भूमिका- एक अभ्यास

(विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

प्रस्तावना

देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये महिलांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे.. त्याचप्रमाणे राज्याच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकासामध्ये ज्याप्रमाणे महिलांची कार्य आणि कर्तुत्व मोलाचे ठरले आहे. त्याचप्रमाणे देशाच्या व राज्याच्या राजकीय विकासामध्ये महिलांचे राजकीय योगदान हे महत्त्वपूर्ण ठरले आहे.

भारतात अगदी आर्याच्या काळापासून स्त्रियांना समाजात महत्त्वाचे स्थान आहे. ऋग्वेदात महिलांना राजकारणात स्थान असल्याचे दर्शविले आहे. हे परकीय आक्रमणानंतरही काही स्त्रिया राजकारणात दिसतात. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्य त्तर काळात अनेक भारतीय स्त्रियांनी अनेक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला भारताच्या इतिहासात महिलांचा राज सत्तेत जसा सहभाग होता तसा तो स्वातंत्र्याच्या लढाईतही त्यानंतर भारतीय स्वातंत्र्यानंतर अनेक महिलांनी राजकारणातील अनेक महत्त्वाची पदवी भूषवले आहेत.

स्वतंत्र काळात भारतीय राजकारणातील स्त्री नेत्या म्हणून इंदिरा गांधी, सोनिया गांधी, ममता बॅनर्जी, मायावती, जयललिता, प्रतिभाताई पाटील, सुषमा स्वराज, शालिनीताई पाटील, सुप्रिया सुळे, शीला दीक्षित व वसुंधरा राजे ही नावे राजकीय क्षेत्रामध्ये प्रसिद्ध आहेत

1 मे 1962 रोजी संयुक्त महाराष्ट्राचची निर्मिती झाली. यानंतर महाराष्ट्रामध्ये महिलांच्या राजकीय प्रक्रियेला सुरुवात झाली. त्यामध्ये विधानसभा विधान परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये महिलांच्या राजकीय कार्याची भूमिका दिसून येते. महिलांच्या राजकीय कार्यामुळे

समाजातील महिलांमधील आत्मविश्वास निर्माण होऊन सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये निर्भीडपणे कार्य करण्याची संधी मिळाल्यामुळे राजकीय, सामाजिक जीवनामध्ये महत्त्वपूर्ण परिवर्तन घडवून आले आहे.

1962 च्या निवडणुकीत ज्यांनी विधिमंडळातील महिलांच्या प्रतिनिधीची मुहूर्त रोवली त्यात देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. संयुक्त महाराष्ट्र बनल्यानंतरची 62 ची ही पहिली निवडणूक 264 जागांसाठी झाली ११६१ उमेदवार रिंगणात होते या निवडणुकीत 36 महिलांनी मतदान कौल मागितला त्यापैकी 13 म्हणजे 30 टक्के अधिक महिला विजयी झाल्या.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना राजकीय आरक्षणाचे कवच प्राप्त झाल्यानंतर व राजकारणात त्यांचा वापर वाढल्यानंतर महिला आत्मविश्वासाने बोलत आहेत काहीतरी करून दाखवण्याची महिलांमधील जिद्द वाढली आहे. स्त्रियांच्या राजकारणातील सहभागाविषयीच्या वाढणाऱ्या प्रतिकूलतेला स्त्रियांना एक शक्ती बनवण्यात यश मिळाले आहे.. स्त्रियांनी स्त्रियांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी समाजभान असलेल्या चांगल्या महिला राजकारणा विषयी नकारात्मकता न बाळगता राजकारणात येत आहेत महिला चळवळीने केवळ कात टाकून समाजकारण न करता राजकीय आरक्षणासाठी लढले पाहिजे आणि स्त्रियांचे समर्थन करण्यासाठी समाजभान असलेल्या चांगल्या महिला राजकारणात धाडल्या पाहिजेत महिला राजकीय क्षेत्रात सक्रिय होत आहेत हे अत्यंत महत्त्वाचे असून त्यातून येणारा काळ नक्कीच बदललेला असेल.

संशोधनाची गरज

महिलांच्या सबलीकरणासाठी व लैंगिक समता निर्माण करण्यासाठी तसेच राजकीय क्षेत्रातील कार्याची ओळख होण्यासाठी सदरील संशोधनाची गरज आहे. राजकीय सामाजिक, क्षेत्रातील महिलांच्या विविध समस्या जाणून

घेण्यासाठी व सोडवण्यासाठी राजकीय क्षेत्रामध्ये राहून महत्त्वपूर्ण भूमिका बजावणे राजकीय पक्ष महिलांना राजकारणामध्ये येण्यासाठी कशाप्रकारे मदत करतात त्या अनुषंगाने महिला राजकीय क्षेत्रामध्ये कार्य करण्यासाठी कशा पद्धतीने प्रेरणा देतात त्यातून महिलांना कार्य करण्याची शक्ती कशी निर्माण होते हे जाणून घेणे गरजेचे आहे.

संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रामध्ये राजकीय क्षेत्रातील महिलांचा सहभाग कसा होता राजकीय क्षेत्रामध्ये महिलांना कार्य करण्यासाठी राजकीय पक्षाने आतापर्यंत कशी भूमिका बजावली आहे. त्या पाठीमागची पार्श्वभूमी काय आहे. हे जाणून घेऊन सध्याच्या स्थितीमध्ये महाराष्ट्रातील राजकीय पक्षाची महिला विषयक भूमिका- एक अभ्यास हा विषय समजून घेण्यासाठी सदरील विषय संशोधकाने संशोध न साठी हाती घेतला आहे.

संशोधनाचे महत्त्व

महाराष्ट्रातील राजकीय क्षेत्रामध्ये कार्य केल्यामुळे लैंगिक कार्यामध्ये समता निर्माण होऊन राजकीय सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करण्याची पद्धत व ध्येय विकसित होऊन राजकीय आत्मविश्वास निर्माण होतो महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी समाजातील महिलांना राजकीय पाठबळ मिळावं यासाठी राजकीय पक्षाची भूमिका कशी आतापर्यंत मोलाची ठरली आहे हे जाणून घेण्यासाठी सदरील विषय महत्त्वाचा ठरतो आहे.

समस्या विधान

महाराष्ट्रातील राजकीय पक्षाची महिला विषयक भूमिका- एक अभ्यास

हा विषय अभ्यासताना संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये 1962 पासून ते आजपर्यंत राजकीय क्षेत्रामधील कार्य व योगदान काय आहे . कोणत्या राजकीय पक्षांनी महिलांच्या राजकीय क्षेत्राला वाव देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेपासून ते राज्याच्या विधिमंडळामध्ये राजकीय नेतृत्व व कार्यशैली ही कशी

राहिली आहे या सर्व बाबींचा आढावा घेण्यासाठी सदरील संशोधनाचा विषय संशोधकांनी संशोधनासाठी हाती घेतला आहे.

पूर्व संशोधनाचा आढावा

कोणत्याही विषयावर संशोधन करण्यापूर्वी संशोधन साहित्याचा आढावा घेणे आवश्यक असते एखाद्या विषयावर पूर्व संशोधन झाले असेल तर त्यातील पुन्हा पुन्हा समोर येणाऱ्या बाबी टाळता येतात पुन्हा संशोधन संशोधकाला निश्चित दिशा देण्याची काम करीत असते महाराष्ट्रातील महिलांची राजकीय स्थिती व राजकीय पक्षाची भूमिका या विषयावर पुढील प्रमाणे संशोधन झालेले आहेत.

1 जाधव विनोद विठ्ठलराव यांनी डिसेंबर 2006 साली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठातून मराठवाड्यातील ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात महिलांची भूमिका व योगदान एक अभ्यास या विषयावर डॉक्टर राम भाऊराव वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

2 महेश आनंदराव मगर यांनी ऑक्टोबर 2015 साली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठातून मागासवर्गीय महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सहभाग एक अभ्यास या विषयावर डॉक्टर राम वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले.

3 देशमुख मनीषा बाबुराव यांनी मे 2012 साली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठातून मराठा समाजातील महिला नेतृत्व मराठवाड्याचा विशेष अभ्यास या विषयावर डॉक्टर केबी गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

4 शार्दुल माणिकराव शेलुकर यांनी डिसेंबर २०१२ साठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठातून मराठवाड्यातील स्त्रियांचे राजकीय

सबलीकरण विशेष संदर्भ बीड जिल्हा या विषयावर प्राध्यापक डॉक्टर रेखा गंगाधर हिंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

5 प्राध्यापक प्रभावती गुंडप्पा कस्तुरे यांनी ऑक्टोबर 2007 स* स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठातून महाराष्ट्र शासनाचे महिला विषयक धोरण एक चिकित्सक अभ्यास या विषयावर प्राचार्य व्ही एन इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

6 संगीता विश्वनाथराव पोपलवार यांनी डिसेंबर 2020 साठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठातून नांदेड जिल्ह्यातील महिलातील सामाजिक आर्थिक जागृती सोय सहाय्यता महिला बचत गटाचा अभ्यास या विषयावर प्राध्यापक डॉक्टर कल्पना एम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

7 पूजा शिवाजी दिवेकर यांनी फेब्रुवारी 2020 साली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठातून मराठवाड्यातील स्त्रियांच्या राजकारणातील सहभाग एक चिकित्सक अभ्यास संदर्भ औरंगाबाद जिल्हा या विषयावर डॉक्टर उमाकांत सावंत सहयोगी मार्गदर्शक डॉक्टर फड एस बी यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत अभ्यास पूर्ण करण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टे निश्चित करण्यात आले आहेत ती पुढील प्रमाणे

1 महिलांच्या सामाजिक, राजकीय संधीबाबत शासनाच्या धोरणांचा अभ्यास करणे

2 महिलांच्या सामाजिक, राजकीय पक्ष संधीच्या जाणीव जागृती बाबत अभ्यास करणे

3 महिलांच्या सामाजिक, राजकीय स्थितीबाबत राजकीय पक्षाच्या भूमिकांचा अभ्यास करणे

4 महिलांच्या सामाजिक घटक केंद्रित राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षाच्या भूमिकांचा अभ्यास करणे

5 महिलांच्या सामाजिक घटकाचे राजकीय परिस्थितीच्या योगदानाचा अभ्यास करणे

संशोधनाची गृहितके

1 महिलांच्या सामाजिक, राजकीय पक्षाच्या संधी बाबत शासकीय धोरणांची आवश्यकता आहे

2 महिलांमध्ये सामाजिक, राजकीय पक्ष घटकासंबंधी जाणीव जागृती आवश्यक आहे

3 महिलांच्या सामाजिक, राजकीय पक्ष संदर्भात आत्मविश्वास व लैंगिक समानता निर्माण होणे आवश्यक आहे

4 महिलांना राजकीय, सामाजिक घटकांची राजकारण केंद्रित अनुभव नाही

5 महिलांच्या सामाजिक घटकाचे राजकीय प्रतिनिधित्व होणे आवश्यक आहे

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन विषय महाराष्ट्रातील राजकीय पक्षाची महिला विषयक भूमिका- एक अभ्यास हा महिला राजकारणात व राजकीय पक्षाशी निगडित असल्यामुळे सामाजिक शात्राच्या संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या अभ्यास पद्धती पैकी सर्वेक्षणात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी विविध स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे. त्यात प्रामुख्याने दितीय स्तोत्रामध्ये दैनंदिन वर्तमानपत्रे, संशोधन लेख राजकीय पक्षाचा अजेंडा, राजकीय पक्षाची ध्येयधोरणे वार्षिक अंक विविध राजकीय पक्षाच्या परिषदाचे अहवाल इत्यादी स्त्रोतांचा वापर संशोध करण्यात येणार आहे तसेच प्रार्थमिक स्त्रोतामध्ये काही निवडक मुलाखती, प्रश्नावली चा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा

प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्रातील राजकीय पक्षाची महिला विषयक भूमिका- एक अभ्यास हा विषय नांदेड जिल्हयातील राजकीय पक्ष राजकारणातील महिलांची स्थिती या पुरताच मर्यादित आहे. यामध्ये सर्व राज्यातील महिलांच्या राजकीय स्थितीचा व राजकीय पक्षाचा उल्लेख करणे शक्य नाही म्हणून या मर्यादा लक्षात घेऊन सदरील संशोधन विषय मर्यादित केला आहे.

अभ्यासाची व्याप्ती व कालावधी

या विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाणे 2015 ते 2020 या कालखंडाची अध्ययनिक क्षेत्रासाठी निवड केली आहे. कारण नांदेड जिल्हयातील महिलांची राजकीय स्थिती व महिलांच्या बाबतीमध्ये राजकीय पक्षाची भूमिका सूक्ष्मपणे जाणून घेण्यासाठी संशोधकाने सदरील कालखंड निश्चित केला आहे.

प्रकरणाची रूपरेषा

1 प्रस्तावना

2 महिलांची राजकीय स्थिती: शासन धोरणाचा मागोवा

3 नांदेड जिल्हा: महिलांच्या राजकीय पक्ष स्थितीचा मागोवा

4 महिलांची राजकीय पक्ष स्थिती व जाणीव जागृती

5 महिलांच्या राजकीय स्थितीबाबत पक्षांची भूमिका

6 निष्कर्ष व शिफारस

संदर्भ ग्रंथ

आळसेकर अ. स. (1959) ***प्राचीन भारतीय शासन पद्धती, प्रयाग भारती भांगर***, लीडर प्रेस

आवटे संजय (2020) ***गेम ऑफ थ्रोन्स, शक्ती*** पब्लिकेशन

कार्ल मार्क्स (2022) ***कम्युनिस्ट मेनिफेस्टो***

गोडबोले सुजाता***, भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा,*** पुणे राजहंस प्रकाशन

घांगरेकर ची. ग. (1996) ***भारतीय राजकीय व्यवस्था,*** नागपूर, दत्त सन सदर

जोरगुलवार भूषण (1999) ***महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण,*** लातूर

देशमुख अलका, (16 लो. स.) ***लोकशाहीचे बदलते स्वरूप आणि निवडणुकीचे राजकारण***

पाटील भारती, ***स्त्रिया समाज आणि राजकारण,*** हर्मिस प्रकाशन, पुणे

पवार वैशाली, ***महिलांच्या सत्ता संघर्षाचा लेख,*** डायमंड प्रकाशन, पुणे

भारत सरकार (2002) ***भारतीय राज्यघटना***

बागल सतीश (2022***) चिनी महासत्तेचा उदय***

भोगले शांताराम (1990) ***भारतीय स्थानिक शासन,*** विद्या प्रकाशन नागपूर

यमलवाड गोविंद (1999) ***स्थानिक स्वराज्य संस्था,*** कल्पना प्रकाशन, नांदेड

साधू अरुण (2016) ***तिसरी क्रांती,*** राजहंस प्रकाशन

संशोधक

जयंत शंकर बोरगावकर

मार्गदर्शक

डॉ. रेखा आर बने

एस.एस.एम.. मुंडे महाविद्यालय,

गंगाखेड